क्रमांक : ४३१२ /अ
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२३.

**प्रेषक :**

**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**प्रति,**

**महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सदस्य**
**(मंत्री महोदयांसह)**

**महोदय/महोदया,**

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७६ अन्वये महाराष्ट्राचे मा.राज्यपाल सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनाच्या वर्तुळाकार इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील मध्यवर्ती सभागृहात दोन्ही सभागृहांना संबोधून अभिभाषण करतील, असे निदेशानुसार आपणांस कळविण्यात येत आहे.

**मा.राज्यपालांचे अभिभाषण सुरु होण्यापूर्वी व अभिभाषण संपल्यानंतर राष्ट्रगीत होईल.** आपण उपरोक्त वेळी व ठिकाणी कृपया उपस्थित रहावे, अशी आपणांस विनंती आहे.

मा.राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधीचा कार्यक्रम आणि अनुदेश याची एक प्रत सोबत जोडली आहे.

आपला स्नेहांकित,

**(राजेन्द्र भागवत)**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

\\Mls-a-002\d\Data\NON-OFFICIAL BUSINESS\2023\Governor Speech 2023\3 Letter for All MLA Send Final Programme of Governor.docx

**विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोरील मा. राज्यपालांच्या अभिभाषणाचा कार्यक्रम**
**(सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३)**

**सकाळी १०.४५ वाजता :**

मा. राज्यपाल विधान भवनाकडे येण्यास निघतील.

**सकाळी १०.५५ वाजता :**

(१) मा. राज्यपालांचे विधान भवनाच्या पोर्चमध्ये, आगमन व राष्ट्रीय मानवंदना (National Salute).

(२) महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री; महाराष्ट्र विधानसभेचे मा.अध्यक्ष; महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मा.उप सभापती; मा.संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य; मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र विधानमंडळाचे प्रधान सचिव हे मा.राज्यपालांचे स्वागत करतील.

(३) पोर्चमधील पायऱ्यांच्या वरच्या बाजूस मिरवणूक तयार होऊन तिचा क्रम खालीलप्रमाणे राहील :-

**प्रधान सचिव**
**विधानमंडळ**

| | |
|---|---|
| **उप सभापती विधानपरिषद** | **अध्यक्ष विधानसभा** |

**मा. राज्यपाल**

| | |
|---|---|
| **राज्यपालांचे परिसहायक** | **राज्यपालांचे परिसहायक** |
| **संसदीय कार्य मंत्री** | **मुख्यमंत्री** |
| **राज्यपालांचे प्रधान सचिव** | **मुख्य सचिव** |

..२/-

(४) सदरहू मिरवणूक मुख्य इमारतीच्या उद्वाहनापर्यंत जाईल व त्यानंतर उद्वाहनाने पाचव्या मजल्यावर येईल.

(५) उद्वाहनातून बाहेर पडल्यानंतर वरीलप्रमाणे मिरवणूक पुन्हा तयार होईल व मध्यवर्ती सभागृहात येईल.

(६) मिरवणूक मध्यवर्ती सभागृहात व्यासपीठालगतच्या प्रवेशमार्गाने प्रवेश करुन व्यासपीठाकडे जाईल.

(७) मा.राज्यपालांनी सभागृहात प्रवेश केल्यापासून त्यांनी आपले स्थान ग्रहण करेपर्यंत सर्व उपस्थित त्यांच्या स्थानी उठून उभे राहतील.

(८) मा.राज्यपालांच्या अनुक्रमे उजव्या व डाव्या बाजूला किंचित मागे मा.अध्यक्ष व मा.उप सभापती आसनस्थ होतील.

(९) मा.राज्यपालांचे परिसहायक राज्यपालांचे अभिभाषण संपेपर्यंत त्यांच्या मागे उभे राहतील.

(१०) मिरवणुकीतील इतर अधिकारी व्यासपीठाच्या खालील बाजूस त्यांच्यासाठी ठेवलेल्या खुर्च्यांवर बसतील.

(११) **त्यानंतर राष्ट्रगीत सुरु होईल.**

(१२) **राष्ट्रगीतानंतर मा. राज्यपाल दोन्ही सभागृहांना संबोधून अभिभाषण करतील.**

(१३) **मा.राज्यपालांचे अभिभाषण संपल्यानंतर राष्ट्रगीत होईल.**

(१४) त्यानंतर पूर्वीच्या क्रमानुसार मिरवणूक पुन्हा तयार होऊन पोर्चपर्यंत जाईल.

(१५) मा.राज्यपाल मध्यवर्ती सभागृहातून बाहेर जाईपर्यंत सर्व उपस्थित उठून उभे राहतील.

(१६) पोर्चजवळ आल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री; महाराष्ट्र विधानसभेचे मा.अध्यक्ष; महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मा.उप सभापती; मा.संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य; मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र विधानमंडळाचे प्रधान सचिव हे मा.राज्यपालांना निरोप देतील.

******

# अनुदेश

**मा.राज्यपालांचे अभिभाषण विधान भवनाच्या वर्तुळाकार इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील मध्यवर्ती सभागृहात होईल.** सर्व सदस्यांनी मध्यवर्ती सभागृहात आपापल्या जागी सकाळी १०.५० वाजेपर्यंत स्थानापन्न व्हावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. मा.राज्यपालांनी मध्यवर्ती सभागृहात प्रवेश केल्यानंतर ते आपले स्थान ग्रहण करीपर्यंत सर्व सदस्य आपापल्या जागी उठून उभे राहतील. **मा.राज्यपालांच्या अभिभाषणाच्या सुरुवातीस व अभिभाषण संपल्यानंतर राष्ट्रगीत होईल.** त्याचप्रमाणे मा.राज्यपाल आपले अभिभाषण संपवून मध्यवर्ती सभागृहाबाहेर जातेवेळीदेखील सर्व सदस्य उठून उभे राहतील. मा.राज्यपाल महोदयांचे प्रस्थान झाल्यानंतर सदस्यांना २० मिनिटे विश्रांतीसाठी सुट्टी राहील. त्यानंतर सर्व सदस्य आपल्या सभागृहात एकत्र येतील.